नियोजित सहकारी संस्थांच्या नोंदणीबाबत

महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग,
परि.प.क्रमांक =ससेवा-१०९५/प्र.क्र.८९२/२-सी,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक २४ जून, १९९६.

शासन परिपत्रक.

सन्माननीय विधानसभा सदस्य, विधान परिषद सदस्य, लोकसभा सदस्य, तसेच अनेक मान्यवर व जनतेकडून नियोजित सहकारी संस्थांना बँकेत खाते उघडण्यास, नियोजित संस्थांची नोंदणी करण्यास, अस्तित्वातील सहकारी संस्थांचे कार्यक्षेत्र वाढवून देण्यास, तसेच कर्ज मर्यादा वाढवून देण्यास परवानगी मिळावी अशी विनंती करणारी निवेदने मा.मंत्री [सहकार] तसेच मा.राज्यमंत्री [सहकार] यांना प्राप्त होतात. त्यावर मा.मंत्री [सहकार] तसेच मा.राज्यमंत्री [सहकार] यांनी नियोजित संस्थेला बँकेत खाते उघडण्यास / नियोजित संस्थेची नोंदणी करण्यास, कार्यक्षेत्र वाढीस तसेच कर्ज मर्यादा वाढीस परवानगी देण्यात येत आहे असे आदेश दिलेले आहेत. सदर आदेश संबंधीत निबंधकांना परस्पर मा.मंत्री महोदयांकडून अथवा विभागामार्फत कळविण्यात आलेले आहेत.

२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील तरतुदीनुसार नियोजित सहकारी संस्थांच्या बँकेत खाते उघडण्यासंबंधीचे / नोंदणी संबंधीचे तसेच कार्यक्षेत्र वाढ, कर्ज मर्यादा वाढीचे / मंजूर करण्याचे अधिकार संबंधीत निबंधकांना प्रदान करण्यात आलेले आहेत. त्यामुळे नियोजित सहकारी संस्थांना बँकेत खाते उघडण्यास परवानगी देणे, त्यांची नोंदणी करणे, कार्यक्षेत्र वाढ मंजूर करणे, कर्जमर्यादा वाढवून देणे इत्यादी बाबींवर महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम, १९६१ यामधील संबंधीत तरतूदी तसेच शासनाचे धोरणात्मक आदेश लक्षात घेऊन निबंधकांनी त्यांचेच स्तरावर योग्य तो निर्णय घेणे आवश्यक आहे. या संदर्भात अशाही सूचना देण्यात येत आहेत की, यापूर्वी मा. मंत्रीमहोदयांकडून अथवा विभागाकडून नियोजित सहकारी संस्थांना बँकेत खाते उघडण्यास, नोंदणी करण्यास, कार्यक्षेत्र वाढीस, कर्जमर्यादा वाढीस किंवा निबंधकांनाच अधिकार असलेल्या बाबींसंबंधी परवानगी देण्यात आलेल्या आदेशांची अंमलबजावणी झाली नसल्यास ते मागे घेण्यांत / रद्द करण्यांत आले असून त्यावर अशा परवानगीस अनुलक्षून पुढील कोणतीही कारवाई करू नये. अशा ज्या प्रकरणांत नियोजित संस्थेला शासनाच्या परवानगीनुसार फक्त खाते उघडण्यास परवानगी देण्यांत आली असेल त्या प्रकरणांत नियोजित संस्थेच्या

कार्यक्षेत्रातील तशाच प्रकारच्या इतर सहकारी संस्थांना त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देऊन दिलेली परवानगी कायम ठेवावी अथवा रद्द करावी याबाबतचा गुणावत्तेनुसार तातडीने निर्णय घ्यावा.

यापुढे नियोजित संस्थांना खाते उघडण्यास / नोंदणी करण्यास कार्यक्षेत्राबाहेरील परवानगी देण्यापूर्वी कार्यक्षेत्रातील तशाच प्रकारच्या सर्व संस्थांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची पुरेपूर संधी उपलब्ध करून द्यावी आणि या सर्व सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी होईल याची कृपया दक्षता घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

सही /- x x x
[ सौ. प्र. श्री. वैद्य ]
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन,
सहकार व वस्त्रोद्योग विभाग.

जा. क्र. प्रशासन/२-अ/स.सं./नोंदणी/सन ९६,
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचे कार्यालय,
पुणे-१. दिनांक :- २९ जून, १९९६.

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

१] विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, [ सर्व ]

२] जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था [ सर्व ]

३] उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था [ सर्व ]

४] कार्यासन अधिकारी [ सर्व ], मुख्यालय, पुणे.

त्यांना विनंती करण्यात येते की, सदरच्या सूचना त्यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

९०४ ३०९
३०।०९।९६

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था,
महाराष्ट्र राज्य, पुणे - १ यांचेकरीता.